# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक ३१ जुलै २००९ रोजी संपन्न झालेल्या विशेष सभेचे इतिवृत्त.</u>**

शुक्रवार दिनांक ३१/०७/२००९ रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ४.०० वा. वंदेमातरम या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त,डॉ.पुरूषोत्तम भापकर (भाप्रसे), नगर सचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालीलप्रमाणे पालीका सदस्य उपस्थित होते.

०१. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०२. स.स.श्री.गजानन रामकिशन बारवाल
०३. स.स.श्री.संजय उत्तमराव जगताप
०४. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०५. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०६. स.स.श्री.दाभाडे मिलिंद यशवंत
०७. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
०८. स.स.श्री.जेम्स अंबिलढगे
०९. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१०. स.स.सौ.विजयाताई बनकर
११. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१२. स.स.सौ.रजनी रमेश जोशी
१३. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१४. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
१५. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
१६. स.स.सौ.सुशिला भगवान रगडे
१७. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
१८. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
१९. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
२०. स.स.श्रीमती खान मेहरून्निसा खान हमीद
२१. स.स.श्री.मो.जावेद मो.इसहाक
२२. स.स.श्रीमती यास्मीन बेगम अ.कदीर
२३. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
२४. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
२५. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान
२६. स.स.श्रीमती लता श्रीनिवास दलाल
२७. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडूरंग
२८. स.स.श्री.संजु रिडलॉन
२९. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
३०. स.स.श्री.खान निसार महमंद खान
३१. स.स.श्री.खान हाजी शेरखान अ.रहेमान

३२. स.स.सौ.राऊत छाया विलास
३३. स.स.श्री.अशोक गोरखनाथ विरकर
३४. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
३५. स.स.श्री.संतोष सुधाकरराव जेजुरकर
३६. स.स.श्री.त्र्यबंक तुपे
३७. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
३८. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
३९. स.स.श्रीमती खान जहुरबी नासेर
४०. स.स.श्रीमती बोरामणीकर कला सुरेश
४१. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
४२. स.स.श्री.मधुकर दामोधर सावंत
४३. स.स.श्रीमती रेखा कैलास काथार
४४. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
४५. स.स.श्रीमती पाटणी हर्षमाला विजयकुमार
४६. स.स.श्रीमती डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
४७. स.स.श्री.खुडे विजय किसन
४८. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
४९. स.स.श्री.दामोधर माधवराव शिंदे
५०. स.स.श्रीमती सरिता अशोक ससाणे
५१. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
५२. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
५३. स.स.श्री.विसपुते शशांक दामोधर
५४. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
५५. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
५६. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
५७. स.स.श्री.जोशी संजय रामदास
५८. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
५९. स.स.श्री.मनमोहनसिंग करमसिंग ओबेरॉय
६०. स.स.श्री.संजय पांडूरंग शिरसाट
६१. स.स.श्रीमती अल्पा विकास जैन
६२. स.स.श्रीमती मोमीन सफिया फिरदोस अय्युब खान
६३. स.स.श्रीमती अनिता नंदकुमार घोडेले
६४. स.स.श्री.विनोद सोनवणे

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.राजेश (पप्पु) व्यास
०२. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०३. स.स.श्री.सुरेंद्र कुलकर्णी

श्री.सलीम खान : मागिल बैठकीत मी गैरहजर होतो नवीन आयुक्त यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करतो. जोपर्यंत आयुक्त येथे राहतील त्यांनी या शहराच्या विकासासाठी चांगले काम करावे अशी अपेक्षा करतो.

**<u>विषय क्र. ५५० :</u>**

सन १९९९-२००० ते सन २००५-२००६ पर्यंतच्या लेखा परिक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

**संवाद :**

श्री.मुजीब खान : ऑडीट अहवालावर यापूर्वी पैठण येथे बैठक घेतली होती त्यावेळीही अहवाल दिला होता नागरीक,अधिकारी,पदाधिकारी यांचेकडे महापालिकेची रक्कम दाखविलेली होती ती वसुली आजपर्यंत झाली नाही. सन १९९९ ला ज्या त्रुटी होत्या त्याच २००६ पर्यंत च्या अहवालात नमूद केल्या कार्यवाही होवून आक्षेप वगळले गेले नाही का? काही विभागाकडून माहिती आलेली नाही असे यात दिले सर्व विभागाची संपूर्ण माहिती येत नाही तोपर्यंत यावर चर्चा करणे व निर्णय घेणे कितपत योग्य आहे. स.सदस्य श्री.कोकाटे हे स्थायी समितीचे सभापती असतांना त्यांनी अक्षेप क्लिअर करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करून माहिती सभागृहासमोर येईल असे म्हटले होते आजपर्यंत कार्यवाही झाली नाही हा प्रशासनाचा भाग आहे यात दोन प्रकरणाच्या खरेदीखतासाठी रक्कम उचललेली आहे पानक्र.१७५ वर अमरप्रित रस्त्याची जागेचा मोबदला देण्यासाठी ८०.३६ लक्ष रक्कम दिली मालकी एकाची पैसे दुसऱ्यास दिले. हा मुद्याही २००६ पर्यतच्या अहवालात नमूद केला मोठया रक्कम दिल्या जातात महापालिकेची रक्कम आहे प्रशासनाचे याकडे लक्ष नाही. रक्कम कुणी दिली कशाबध्दल दिली कुणास दिली मालकी हक्क कुणाचा आहे यात कुठेही उल्लेख नाही यापूर्वी सर्वसाधारण सभे समोर हा मुद्या आला होता मा.आयुक्त यांनी कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले होते अदयाप कार्यवाही झाली नाही. पान क्र.१९३ जकात विभागासंबधी ९ बुक बाबत मुद्या मी काढला होता जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले होते अदयाप तीही कार्यवाही झाली नाही. ९ बुक ऐवजी ७ बुकाचा उल्लेख केलेला आहे त्या संदर्भात चौकशी झाली परंतु पुढील कोणतीही कार्यवाही झाली नाही. ९ बुकाच्या संदर्भात १९९९ पासून २००६ पर्यत लेखा परीक्षण अहवालात जशाच्या तसे येत आहे २००९ वर्ष चालू आहे अदयाप त्या प्रकरणात कार्यवाही झाली नाही. ज्या विभागाकडून माहिती येत नाही यास प्रशासन जबाबदार आहे किंवा नाही याचा खुलासा करावा. एकच विषय १०-१० वर्ष ऑडीट मध्ये येत राहिल हे बरोबर नाही.

मा.महापौर :मुख्यलेखा परीक्षक यांनी हा प्रस्ताव ठेवलेला आहे या विषयाचे प्रयोजन व सविस्तर माहिती या सभागृहात त्यांनी दयावी.

श्री.गजानन बारवल : या अहवालाविषयी प्रशासनाचे म्हणने काय आजपर्यंत काय कार्यवाही केली. माहिती घ्यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : लेखा परीक्षण अहवाल सर्वसाधारण सभेत आला त्याबध्दल आपले धन्यवाद परंतु आजपर्यंत जे दोषी आहे त्यांचेवर कार्यवाही झाली नाही ज्यांचेवर प्रशासनाने कार्यवाही केली तर स्थायी समितीने अभय दिले स्थायी समितीच्या निर्णयानुसार कार्यवाही केली तर सर्वसाधारण सभेने त्या कर्मचाऱ्यांना अभय दिले अशी कार्यवाही होत राहिल्यास या अहवालानुसार कार्यवाही केली तरी काहीही अर्थ राहणार नाही. लोकांच्या डोळयात धुळ फेकल्यासारखे होईल महापालिकेची बदनामी आणखी समोर येईल. अधिकारी कर्मचारी नगरसेवक सर्व रस्त्यावर येतील. यात प्रकरण अक्षेपार्ह आहे फायनल स्टेपचा विषय

आहे.जबाबदारी कुणावरही आजपर्यत फिक्स नाही ६ ते १० वर्षापासून कार्यवाही केल्याचा यात उल्लेख नाही. ११ वर १,१७ लक्षची अफरातफर,कोण भरणार जबाबदारी कुणावर, उल्लेख नाही. असे पूर्ण आक्षेपच्या बाबतीत आहे.यासाठी ॲक्शन फार्म कमेटी नियुक्त करावी त्याचा रिपोर्ट आल्यानंतर कार्यवाही करता येईल.त्रुटया येतात त्यावर ॲक्शन होत नाही अहवाल येवून उपयोग नाही. चांगली ॲक्शन फार्म कमेटी नियुक्त करावी तरच या अहवालाचा उपयोग आहे. एवढे पॉईन्ट दिले की खाजगी फॉर्मलिटीमध्ये एवढे येत नाही. एवढया मोठया चुका होतात एक रिपोर्टमध्ये ५०-५० अक्षेप आहे.याचा निपटारा करणार असेल तर करावा कार्यवाही करणे उचीत होईल.

श्री.संजय सिरसाट :पहिल्यांदा अहवाल सभागृहात येतो आहे.चर्चा होत असेल तर ठिक आहे, नसता काहीही अर्थ नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : प्रशासनाच्या खुलाशाची गरज नाही अहवाल समोर आलेला आहे. यानुसार ॲक्शन घेता येते.

मा.महापौर :हा अहवाल ठेवण्याचे प्रयोजन काय याची माहिती सभागृहाला दयावी. त्यानंतर चर्चा करता येईल.

श्री.अ.रशिद खान :२००५ मधील ॲक्शन आहे कार्यवाही केल्याचे यात उल्लेख नाही.जे दोषी आहे त्यांचेवर काय कार्यवाही झाली यावर कशाबध्दल चर्चा करायची कळायला मार्ग नाही संबधीतावर कार्यवाही का केली नाही. बैठक होईल कार्यवाही होणार नाही खुलासा करतांना प्रशासनाचा अभ्यास असायला पाहिजे. जो रिपोर्ट आला तो बरोबर आहे का टप्प्या टप्प्याने रिपोर्ट येतो हे चुकीचे आहे जबाबदारी कुणावरही फिक्त केली नाही.

श्री.मुजीब खान :ऑडीट रिपोर्ट ठेवणे म्हणजे सभागृह व जनतेसमोर कोण दोषी आले पाहिजे. १० रू.उचल केले ८ खर्च केले २ जमा केले नाही. यात नगरसेवकांकडे तसेच प्रशासनातील अधिकारी यांचेकडे रक्कम बाकी आहे वसुल झाली नाही. प्रशासनाकडून ज्या चुका झाल्या ते सभागृहासमोर आणले, या सभागृहाने यावर निर्णय दयावा. अहवाल सादर करण्यापूर्वी प्रशासनाने संबधीत कर्मचारी अधिकारी यांचेवर कार्यवाही का केली नाही. यावर निर्णय घेतला व मा. न्यायालयात कुणी प्रकरण दाखल केले तर यात सभागृहाला दोषी धरले जाईल याची जाणीव ठेवावी.यापूर्वीही असे ठराव सभागृहात आले त्यात नगरसेवकांना दोषी ठरविले तसा प्रकार यात होवू नये.दोषीवर कार्यवाही करणे हे प्रशासनाचे काम आहे. १५-२० दिवसात सर्व विभागाची माहिती घेवून प्रशासनाने काय कार्यवाही केली त्याची यादी सादर करावी त्यानंतर यास मंजूरी दयावी आज मंजूरी देणे योग्य नाही.

श्री.प्रशांत देसरडा :सन १९९९-२००६ पर्यतचा अहवाल सादर केला त्यात ब-याचशा सुचना आणि त्रुटी आहे १९९९ च्या अहवालात ज्या त्रुटी होत्या त्यातील काही वगळल्या सुध्दा गेल्या असतील परंतु त्याची नोंद २००६ पर्यतच्या अहवालात आली स्थायी समितीकडून पुस्तक आले स्थायी समितीने काय सुचना केले त्यावर आयुक्तांचे मत काय

सदरचा अहवाल हा स्थायी समितीच्या निर्देशानुसार आलेला आहे का असा प्रश्न येतो.जी अनामत रक्कम अधिकारी कर्मचारी नगरसेवकांनी घेतली ती ८१ लक्षच्या घरात आहे एक रेटलिस्टचे काम करण्याचे सुचना केल्यास काम होत नाही.या अहवालातील अक्षेप हे १९९९ पासूनचे आहे आजपर्यत प्रशासनाने कार्यवाही करायला पाहिजे होती ती केली नाही. अनेक विभागाने वाटेल त्या प्रमाणे साहित्य खरेदी केले त्या विषयी अनेक अक्षेप आहे त्यासाठी एक भांडार असावेत एका विभाग प्रमुखावर जबाबदारी असावी. लहानात लहान असेल एकत्रीत घ्यावे. अनेक त्रुट्या आहेत. प्रशासनाने लेखी स्वरूपात द्यावे. त्यानंतर सविस्तर चर्चा करता येईल. जो अहवाल आला यावर प्रशासनाचे काय मत आहे लेखी कळवावे त्यानंतर सविस्तर चर्चा यावर करता येईल.

सौ.लता दलाल :सन २००५-०६ पर्यतचा अहवाल दिला मागिल तीन वर्षाचा यात नाही जो दिला त्यात मोठी थकबाकी येणे दाखवली २००६ नंतर आजपर्यत यातील काही प्रकरणे निकाली काढले किंवा काय त्याचा अहवाल यासोबत नाही त्यानंतर यावर चर्चा करता येईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:सन १९९९-२०००च्या अहवालात पान क्र. ३६ वर नगररचना विभागामार्फत बांधकाम परवानगी व विकास शुल्क ई. साठी चलना मार्फत रक्कम स्विकारण्यात येते अहवाल वर्षात असे निदर्शनास आले की संबधीताकडून रक्कम भरणा करण्यास्तव चालान तयार करण्यात येवून ते रद्द करण्यात आले. त्याचे उर्वरीत ३ प्रति चालन पुस्तकात नाही.काही चलने कोरी असून त्यामागे चालान स्वीकारल्याची स्वाक्षरी आहे.अशा प्रकरणांची छाननी अंती रक्कम रू.१९,०९,२७८/- इतकी रक्कम वसूल करण्या संदर्भात संचिका उपलब्ध करून देण्यांत आले नाही. निदर्शनास आले. याबाबत पडताळणीस्तव संबंधित बांधकाम परवानगी व इतर संचिका त्वरीत उपलब्ध करून देण्याची सुचना केली असता आजपावेतो संचिका उपलब्ध करून देण्यात आल्या नाहीत असे म्हटले आहे.यास जबाबदार कोण आहे गेल्या १० वर्षात कार्यवाही झाली नाही. या संदर्भात गेल्या १० वर्षात का कार्यवाही करण्यात आली नाही. सदर संचिका ऑडीट विभागाकडे का पोहचली नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे : अनेकांनी अनुपालन केले नाही दोषी असल्याचे सिध्द झाले जागा खरेदीसाठी दोन वेळेस रक्कम दिली खरेदीखत करण्याचा खर्च मालकाने करण्या ऐवजी महापालिकेने केला.१९९८ साली ११ महिण्याचा करार केला अदयापपर्यत त्या मालमत्तेची रक्कमही घेतली नाही अनेक प्रकरणे यात आहे.अनुपालन करण्यात आले नाही का केले नाही यास दोषी कोण अशी विचारणा केली तर याची उत्तरे कोण देणार आहे याची माहिती घ्यावी.एकदा ऑडीटचा अहवाला आल्यानंतर त्यावर समिती गठीत करणे नियमाप्रमाणे येत नाही.अहवालानुसार कार्यवाही करणे अपेक्षीत असते.

श्री.संजय जोशी :एवढया वर्षानंतर असा अहवाल या सभागृहासमोर आला आपले अभिनंदन मुख्य लेखा परीक्षक यानी अहवाल स्थायी समितीकडे सादर करणे व स्थायी समितीने झालेल्या चुका दुरूस्ती व कार्यवाही

करून तसा अहवाल सर्वसाधारण सभेकडे पाठवावा अशी पध्दत आहे.त्या पध्दतीने हा अहवाल आला असे ग्रहीत धरावे या अहवालात जवळपास ४००-५००प्रकरणात अनुपालन झाले नाही समायोजन केलेले नसेल किंवा जागा खरेदी बाबत डबल कार्यवाही झालेली असेल.अशी सर्वच प्रकरणे गंभीर आहे.मुख्य लेखा परीक्षक यांनी अहवाल दिल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याची जबाबदारी आयुक्तांची असते एखादया प्रकरणाची खरोखरच संचिका मिळत नसेल तो भाग वेगळा आहे परंतु जी प्रकरणे समोर आली त्या बाबतीत प्रशासनाने काय कार्यवाही करण्याचे निश्चित केले.माहिती घ्यावी प्रशासनाला कार्यवाही करण्यास सभागृह ठरवेल त्याप्रमाणे वेळ देवू व कार्यवाही केल्या बाबतचा अहवाल या सभागृहा समोर प्रशासनाने ठेवावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :ऑडीट विभागाने माहितीची मागणी केल्यानंतर त्या त्या विभागाने माहितीची पुर्तता करणे बंधनकारक असतेका असेलतर अनेक विभागाकडून कागदपत्राची पुर्तता झालेली नसल्याचे या अहवालात नमूद केले अशावेळी संबधीतावर कार्यवाही होणार आहे का? याचाही खुलासा घ्यावा.

मा.महापौर :मुख्यलेखा परीक्षक यांनी सविस्तर निवेदन करावे ज्या प्रकरणाचे अनुपालन झाले नाही यात दोषी दाखवले त्यांचेवर काय कार्यवाही केली किंवा करणार आहे.

मुख्य लेखा परीक्षक : सन १९९९-२००० ते २००५-०६ पर्यतच्या लेखा परीक्षण अहवालाबाबत थोडक्यात टिप्पणी सादर करण्यात येते.मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १०५ व परि. दोन मधील तरतूदीनुसार तत्कालीन मुख्य लेखा परीक्षकांनी लेखा परीक्षण व त्यांचा अहवाल उक्त अधिनियमातील कलम १०६ (१) व (३) नुसार मा.स्थायी समितीस सादर केला आहे श्री.एम.एन.सोनारयांनी सन १९९९-२००० चा दिं.१०-०५-२००१, सन २०००-२००१ चा दिं.२९-१२-२००१ तर २००१-२००२ चा दिं.२०-०७-२००२ रोजी लेखा परीक्षण अहवाल सादर केला.श्री. एम.पी खैरनार यांनी सन २००२-०३ व २००३-०४ चा दि. २५-६-२००४ रोजी तर श्री.एस.एन. औताडे यांनी सन २००४-०५ व २००५-०६ चा अनुक्रमे दिं. ३१-५-०६ व २-९-२००६ रोजी लेखा परीक्षण अहवाल सादर केला. या सर्व लेखा परीक्षण अहवालावर मा.स्थायी समितीत चर्चा होऊन मान्यता दिली आहे सन १९९९-२००० ते २००५-०६ च्या लेखा परीक्षण अहवालात एकूण ६४९ परिच्छेद आक्षेपरूपाने घेण्यात आलेले आहेत त्यापैकी संबधित शाखा/ विभाग प्रमुखांनी ४४९ परिच्छेदांचे अनुपालन सादर केले असून त्यातून एकूण २४५ परिच्छेद मान्य करून लेखा परीक्षण अहवालातून वगळण्यात आले आहेत तथापी परिच्छेद मुळ स्वरूपात असावेत महापालिकेत काय चालते कसा कारभार चालतो याची स.महापालिका/महासभेला माहिती व्हावी या अनुशंगाने मुळ स्वरूपात लेखा परीक्षण अहवाल सादर केलेले आहे. एखादा परिच्छेद जरी वगळला असला तरी त्या संबधीची चुक काय व काय कार्यवाही झाली होती याची माहिती सभागृहाला व्हावी हा या मागचा उद्येश

होता.अशा चुका व अनियमितता भविष्यात होवू नये म्हणून ताबडतोब ते थांबवावे ही अपेक्षा आहे. महापालिकेचे कामकाज गतिमान, पारदर्शक व लोकाभिमुख व्हावे हा या मागचा उद्येश असून यासाठी आवश्यक अशी उपाययोजना महापालिकेला महासभेला करता येवू शकेल. विनंती या अहवालावर चर्चा करावी.

श्री.मुजीब खान :ज्या चुका झाल्या त्या भविष्यात होवू नये प्रशासनाने मत व्यक्त केले. तेच मत सभागृहाचे आहे.यापूर्वी पैठण येथे या विषयावर स्थायी समितीची बैठक झाली होती अक्षेप मुद्यावर कार्यवाही करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले होते त्याचा निपटारा झाला का झाला असेल तर पुढील अहवालात ते मुद्दे येणार नाही. ४०० आक्षेप होते, काय कार्यवाही झाली.

मा.महापौर : स्थायी समितीने अहवालावर बैठक झाल्यानंतर आताच म्हटल्या प्रमाणे काही प्रकरणामध्ये अनुपालन झाले कोणत्या विभागाचे अक्षेप वगळले गेले त्यासाठी प्रशासनास काय कार्यवाही करावी लागली.

श्री.प्रशांत देसरडा : आपली लेखा परिक्षणाची पध्दत कशी आहे. उदा.नगररचना विभागाकडून एकाच वर्षातील १०० संचिका आल्या त्या पूर्णच संचिकाचे लेखा परीक्षण होते सॅम्पल म्हणून १०-२० संचिकाचे होते.

मुख्य लेखा परीक्षक :लेखा परीक्षण अधिनियमाच्या कलम १०५ नुसार होते त्याशिवाय अनुसूची ड मध्ये दिलेल्या सुचनानुसार होते याशिवाय मुंबई लेखा परीक्षण अधिनियम १९३०च्या नुसार ज्या सुचना आहे त्यानुसार प्रत्येक विभागाचे जेंव्हा लेखा परीक्षण करण्यास सुरूवात केली जाते त्यावेळी मार्च महिणा हा कम्प्लसरी घेतो आवश्यक वाटल्यास पुढील आणखी एक महिणा व या शिवाय लेखा परीक्षक कॅशबुक व तेथील व्यवहार पडताळणी करून त्यातील जे ठराविक निर्णय व मुद्दे घेवून पडताळणी केली जाते. त्यामध्ये गंभीर अनियमितता आढळून आल्यास त्या विभागाची संपूर्ण लेखा तपासणी केली जाते. तक्रार आली किंवा विशेष लेखा परीक्षण करण्याचे आदेशीत केले तर त्यांचे पुर्णपणे लेखा परीक्षण केले जाते. उर्वरीत अभिलेख हे सर्वसाधारणपणे पडताळणी केली जाते या विभागाकडे असलेले मनुष्यबळ विचारात घेवून लेखा परीक्षण केलेले आहे.१९९९पासून विभाग निहाय लेखा परीक्षण झालेले परिच्छेद व अनुपालन किती सादर केले किती वगळले व किती शिल्लक आहे सन १९९९-२००० मधील अक्षेप विवरण तक्ता.

| अ. क्र. | विभागाचे नांव | आक्षेप संख्या | अनुपालन प्राप्त संख्या | पडताळणी अंती वगळण्यात आलेले आक्षेप संख्या | प्रलंबित आक्षेप | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | लेखा विभाग | ०५ | ०४ | ०३ | ०२ | |
| ०२ | जकात विभाग | १२ | ०९ | ०९ | ०३ | |
| ०३ | करमुल्य निर्धारण वि. | १३ | १३ | -- | १३ | |
| ०४ | कर वसूली विभाग | ०५ | ०५ | ०२ | ०३ | |
| ०५ | मालमत्ता विभाग | ०२ | ०२ | ०२ | निरंक | |
| ०६ | नगर रचना | १२ | १२ | ०८ | ०४ | |
| ०७ | कार्यकारी अभियंता | १३ | १३ | ०८ | ०५ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | (पा.पु.जल:निसारण) | | | | | |
| ०८ | अति.शहर अभियंता विभाग | ०९ | ०९ | ०८ | ०१ | |
| ०९ | शिक्षण विभाग | ०४ | ०४ | -- | ०४ | |
| १० | आस्थापना विभाग | ०७ | ०७ | ०७ | -- | |
| | **एकूण :-** | ८२ | **७४** | **४३** | **३९** | |

श्री.प्रशांत देसरडा :मार्च व पुढील एक महिणा लेखा परीक्षणसाठी घेतला जातो आजही ४०० अक्षेप बाकी आहे एखादया वर्षी १०० टक्के ऑडीट केल्यास किती त्रुटया कमी होतील आलेल्या अहवालातील त्रुटी यावर ७ दिवसाच्या आत प्रशासनाने निर्णय घ्यावा काय कार्यवाही केली अहवाल सादर करावा तसेच ज्या प्रकरणात प्रशासनाला निर्णय घेता आला नाही किंवा वसूली करता आली नाही ते प्रकरण सर्वसाधारण सभेपूढे सादर करावे त्यावर हे सभागृह निर्णय घेईल.

सौ.लता दलाल :आजची परीस्थिती काय किती अक्षेप बाकी आहे याची माहिती दयावी. त्यानुसार चर्चा करण्याला अर्थ आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:माहिती दिल्यानंतर काय ॲक्शन घेणार आहे कर मुल्य निर्धारण विभाग टॅक्स संदर्भात १३ अक्षेप होते ते आजही आहेत एकही वगळले गेले नाही.अशी किती प्रकरणे आहे. नुसती चर्चा करून उपयोग नाही लेखी स्वरूपात कार्यवाही होणे आवश्यक आहे.वसुली किती बाकी आहे विभाग वाईज यादी करावी त्यानुसार कार्यवाही करता येईल.नगररचना विभागात विकास शुल्कचे प्रकरण त्यात किती वसुली झाली तसेच जागा भुसंपादनासाठी किती पर्यत अधिकार दिले चुकीने कुणाला व किती रक्कम दिली त्यात किती अफरातफर झाली सभागृहासमोर माहिती ठेवावी.शिक्षण विभागाचे एकाच वर्षातील ४ प्रकरण जशाच्या तसे आहे वगळले गेले नाही.पुढील वर्षाचे काही प्रकरणे असतील सर्व माहिती समोर येत नाही तोपर्यत चर्चा करणे योग्य नाही या बाबत जबाबदारी फिक्स करावी ॲक्शन काय घेणार आहे फायनान्शीयल मॅटर कोण बघणार आहे त्यास जबाबदार कोण इन्टरनल ऑडीट बाहेरच्या ऑडीटरने तपासणी केले जे ऑडीटर कार्यरत आहे हे बाहेरील अधिकारी आहे त्यांनी त्यांचे पध्दतीने चुका काढल्या खालच्या कर्मचारी यांनी चुका केल्या त्यावेळी जे जे अधिकारी कर्मचारी होते त्यांचेवर जबाबदारी फिक्स केली जात नाही तोपर्यत या अहवालास अर्थ नाही. किती वसुली आहे प्रामाणिकपणे वसुल करावी हा जनतेचा पैसा आहे विचार करावा वसुली किती बाकी आहे संपूर्ण फिगर दाखवायला पाहिजे त्यानुसार लेखा विभाग प्रशासन कार्यवाही करेल. जोपर्यत अमलबजावणी जबाबदारी फिक्स केली जात नाही तोपर्यत हे अंतिम होणार नाही.२४५ अक्षेप दिले २००३-०४ ची ही परीस्थिती आहे सन २००६ पर्यची आजची परीस्थिती काय आहे पुढील वर्षाचे अहवालावर नंतर विचार करता येईल. आजची परीस्थिती काय याची माहिती समोर यावी.

सौ.लता दलाल :अनेक प्रकरणे प्रलंबीत आहे मुळ संचिका मागविल्या जातात की नाही त्यावर अभ्यास होतो की नाही प्रलंबीत राहण्याचे कारण काय ?

मुख्य लेखा परीक्षक :सन १९९९-२००० वर्षातील जे काही अनुपालन झालेले आहे त्यातील जे प्रलंबीत परिच्छेद आहे त्याचे अनुपालन आजतगायत झाले त्याची परीस्थिती सांगितलेली आहे.

सौ.लता दलाल :आजची परीस्थिती काय आहे जे अनुपालन झालेले नसेल किंवा त्या प्रकरणाची माहिती लेखा परीक्षण विभागाकडे आली नसेल म्हणून प्रलंबीत असेल त्याची कारणे काय? या बाबतीतल्या संचिका मिळाल्या की नाही संबधीत अधिकारी यांनी माहिती दिली नाही का, माहिती आली असेल परंतु अमुक प्रकरणाचे ऑडीट थांबवून ठेवावे म्हणून कुणाचा दबाव आला का याची माहिती दयावी.

मुख्य लेखा परीक्षक :प्रलंबीत राहण्याचे अनेक कारणे आहेत कुणाचाही दबाव आलेला नाही.अनेक प्रकरणात अनुपालन सादर केला काही प्रकरणात वसुली होणे आहे.ती काही कारणामुळे झाली नाही काही कर्मचारी सेवानिवृत्त, काही मयत झाले अशाकडील यात वसुली होणे बाकी आहे काही माजी स.सदस्य आहे त्यांचेकडे बाकी आहे.

सौ.लता दलाल :जे सेवानिवृत्त झाले त्यांचेकडे त्यावेळी थकबाकी दाखविली असेल त्यावेळी वसुल का करण्यात आले नाही. आजही अनेक अधिकारी /कर्मचारी तसेच बाहेरील लोकांकडून वसुली येणे आहे अहवाल २००६च्या नंतरचा दिलेला नाही पुढील ३ वर्षात थकबाकी येणे आहे वसुल किती झाले कोणत्या विभागाचे ऑडीट बाकी आहे या अहवालानुसार ७८.२३ कोटी रक्कम येणे बाकी आहे. समांतर जलवाहिनीसाठी १०० कोटी भरू शकलो असतो. या अहवालानुसार व सन २००९ पर्यत असलेली थकबाकी वसुल केल्यास ही रक्कम समांतर जलवाहिनीसाठी खर्च करता येईल आजपर्यत किती वसुली येणे आहे व इतर सविस्तर खुलासा घेण्यात यावा.

श्री.संजय जोशी : प्रशासनाने कार्यवाही का केली नाही, केली नसेल तर किती दिवसात व काय कार्यवाही करणार आहे जे सेवानिवृत्त, मयत झाले यांचेकडून वसुली कशी करणार तसेच ज्या विभागाकडून वारंवार संचिका मागवून सुध्दा ऑडीट विभागाकडे दिल्या नाही त्या संबधी काय कार्यवाही करणार यासर्वाचा मा.आयुक्तांनी खुलासा केल्यास शंकेने निरासन होईल

श्री.मुजीब खान : १९८८ पासून आजपर्यत जे पदाधिकारी नगरसेवक होते आहेत त्यांचेकडील किती थकबाकी येणे आहे वसुल का झालेले नाही

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : महापौरकडे नेहमीच महापालिकेची रक्कम बाकी असते. मी महापौर पदावरून पायउतार झाल्यानंतर मी खर्च केलेले ७००० रू.मला महापालिकेकडून मिळाले होते मी महापौर असंतांना मुंबई दौरा केला होता ती रक्कम मला अदयाप मागणी करून ही मिळाली नाही.वेगळी चर्चा करून चुकीची माहिती वृत्तपत्रात येवू नये.

श्री.अ.रशिद खान :मी महापौर पदावरून जाण्या अगोदर थकबाकी क्लिअर केली. पहिला महापौर आहे निवासस्थान घेतांना व देतांना चार्ज घेतला दिला.

श्री.गजानन बारवाल :मी महापौर निवासस्थान सोडण्यापूर्वी चार्ज दिला होता.चुकीची माहिती देवू नये.

श्री.अ.रशिद खान : सेवानिवृत्त होवून मयत झाले आज त्यांचे कुणीही नाही का, काही अधिकाऱ्यांच्या संदर्भातही ऑडीट चालू आहे जबाबदार असलेल्यांचे नाव येते नोटीस देवून खुलासा घेतला जातो त्यावर ॲक्शन घेतली जाते तसे या अहवालात दिले नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सन १९९९-२००० मधील नगररचना विभागाची १९.०९ लक्षची संचिका १० वर्षापासून मिळत नाही या विभागाचे संपूर्ण ऑडीट नुसार ८.५० कोटीचे चालान गायब आहे.किमान एकवर्षाचा तरी खुलासा करावा.१९.०९ लाखाची फाईल चालन,संचिका कोठे आहे. उधारीत किती परवानगी दिली.

श्री.संजय जोशी :उधारीत धनादेश घेवून बांधकाम परवानगी दिली त्या बाबतीत ही ऑडीट करावे.

श्री.अ.रशिद खान : महापौर बंगल्यावरून सामान गेले त्यांचेही ऑडीट करावे.

श्री.गजानन बारवाल :या अहवालात अनेक त्रुटी आहे त्यातील काही बाबी आपल्या समोर ठेवतो आताच म्हटले आजी/माजी पदाधिकारी नगरसेवक यांचेकडे बाकी आहे तसेच अधिकारी/कर्मचारी यांचेकडे प्रवास भत्ता,साहित्य खरेदी,विविध कार्यक्रम अशी वेगवेगळया कामासाठी उचल केले ॲडव्हॉन्स र.८१.१२ लक्ष आहे. याची सविस्तर माहिती समोर येत नाही त्यामूळे संभ्रम निर्माण होतोकी कुणाकडे किती बाकी आहे.सन २००६ पासून २००९ पर्यत कुणी किती रक्कम जमा केली याची माहिती नाही.अनेकाकडून धनादेश घेतले जातात सन १९९९-२०००चे ९३,सन २००१चे २९, सन २००२ चे ९७ सन २००३-४ चे १३ सन २००४-०५ चे २६ तर सन २००५-०६ मधील ८० असे धनादेश वटलेले नाही.यात रक्कम कमी जास्त असू शकते परंतु धनादेश वटवले जात नाही ही गंभीर बाब असून संबधीतावर कार्यवाही होणे आवश्यक होते ती झाली नाही. कुठे किती डिपॉजीट आहे रक्कम आली व खर्च झाली किती याची वेळोवेळी बँकेकडून माहिती घ्यायला पाहिजे १९९९ पासून २००६ पर्यत घेतली नाही गंभीर बाब आहे. शिक्षण विभागातील गणवेश खरेदी संदर्भात ३.८९ लक्ष आणखी येणे आहे सन १९९९-२००० मध्ये खरेदी केलेले गणवेषची माहिती आजपर्यत आलेली नाही.सन २००० ते २००९ पर्यत अनेक माहिती येणे प्रलंबीत आहे काय निर्णय झाले माहिती नाही.शालेय साहित्य खरेदी बाबत अनेक तफावत दिसून येते. शहर अभियंता विभागाने लोखंड खरेदीसाठी २१.५४ लक्षचे ॲडव्हान्स घेतले ते लोखंड खरेदी केले ते घेण्याची गरज होती का. कारण १.४० मॅ.टन लोखंड पडून आहे.त्याची विल्लेवाट कशी लावणार आहे. अनेक बाजारचा ठेका दिल्याची रक्कम,शॉप,हॉल व इतर मालमत्ताचे भाडे वसूल करण्याकडे दुर्लक्ष करण्यात आले.ते वसूल करण्याकडे लक्ष दयावे.आरोग्य विभागात ५.२८ लक्षचे आर्थिक नुकसान झाल्याचे यात

नमुद केले सन २००१ पासून संबधीत डॉक्टर सेवानिवृत्त झाले ते कुठे आहे माहित नाही झालेले नुकसान कसे भरून निघेल याचा ही खुलासा करावा.सन १९९९-२००० मध्ये जकात विभागाकडून रू. ९२९८ एवढी रक्कम कमी दाखवले यापेक्षा जास्त रक्कम असू शकते. मध्यतंरी स.सदस्यांनी पावती बुकाच्या बाबतीत तक्रारी केल्या अनेक पावती बुक हे गायब आहे.जो अहवाल आला तो चुकीचा वाटतो. मालमत्ता विभागाचे १५.१६ लक्ष रक्कम येणे बाकी आहे ती केंव्हा येणार उल्लेख नाही. अनेक येणे रक्कममध्ये मालमत्ता धारकाचे नाव दिले परंतु करोडो रूपये कंपनीकडून येणार त्यांची नावे यात दिली नाही. म्हणजे लेखा परीक्षणामध्ये काही तरी त्रुटी आहेत, वाहनतळ पोटी मोठी थकबाकी येणे आहे ते वसुल का झाले नाही पुर्वीचेच ठेकेदार किंवा त्यांचे नातेवाईकांना ठेका दिल्याचे दिसून येते.अग्निशमन विभाग महत्वाची सेवा पुरविते त्याचे २८ लक्ष येणे बाकी आहे हे सुध्दा गंभीर आहे यात मोठया प्रमाणात गफलत असल्याचे वाटते.लेखा परीक्षण आले ही अभिनंदनाची गोष्ट आहे. परंतु यावर चांगल्या प्रकारे अभ्यास करून योग्य अशी चर्चा करून सविस्तर मांडणे व संबधीतावर कार्यवाही करणे गरजेचे आहे.कारण आताच सभापती यांनी म्हटले संचिका गायब आहे किती संचिका गायब आहे याची माहिती आज नाही.भाडांर विभागाची काही प्रकरणे प्रलंबीत आहे त्यांचे रेकॉर्ड मिळत नाही आताच म्हटले की महापौर बंगल्यावरील साहित्याचे ऑडीट करावे तसा तेथे काही प्रकार झालेला नाही चौकशी करणार असेल तरी दुमत नाही.स.सौ. लता दलाल यांनी म्हटल्या प्रमाणे ७८ लक्ष रक्कम येणे बाकी आहे.तसेच शहरात अनेक होर्डीग लावण्यात येतात त्यापासून ७० लक्ष वसूली येणे आहे उत्पन्न मिळत नसेल तर त्यावर ब्रेक लावणे आवश्यक आहे कायदेशीर कार्यवाही करावी तसेच ज्यांचे धनादेश वटवले गेले नाही त्यांचेवरही नियमाने कार्यवाही करावी जेणे करून वसुलीत भर पडेल.

श्री.मुजीब खान :जेंवढया रक्कमेचे बजेट असते त्याचे संपूर्ण जमा खर्चाचे ऑडीट होते का? की, त्रुटया निघतात त्याचे होते.

श्री.अ.रशिद खान : कोरम नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :वर्षवाईज अहवालावर चर्चा करावी तरच चर्चा करता येईल. नसता अनुपालन केंव्हा होणार आहे त्याचा खुलासा घ्यावा.

मा.महापौर : यावर आतापर्यत काय कार्यवाही झाली व होणार आहे

श्री.मुजीब खान :जेवढे बजेट तेवढयाचे पुर्ण ऑडीट होते का ?

श्री.अ.रशिद खान :कोरम नाही इलिगल काम करू नये.सभेचे कामकाज चालवू नये.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : प्रशासन या संबधीत काय ॲक्शन घेणार आहे प्रत्येक वेळेस खुलासा घेणे योग्य नाही. कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार आयुक्तांना आहे. तेवढाच खुलासा घ्यावा.

मा.महापौर :जे जे मत स.सदस्यांनी मांडले त्या संदर्भात व १०० टक्के वसुली करण्यासंदर्भात प्रशासनाने काय प्रयत्न केले मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त :सन १९९९-२००० ते २००५-०६ पर्यत अहवाल सादर केला १९९९ पासून १० वर्षाचा कालावधी झाला यापूढे प्रत्येक वर्षाचे प्रत्येक वर्षी ऑडीट सादर व्हायला पाहिजे.तसा प्रयत्न केला जाईल.यात ६४९ अक्षेप नोंदविण्यात आले त्यापैकी ४४९ अक्षेपाचे अनुपालन झाले २४५ वगळले व ४०४ बाकी आहे.सन १९९९-२००० चा विचार केल्यास या वर्षात ९२ अक्षेप होते त्यातील आजही ३९ अक्षेप म्हणजे ५० टक्के प्रलंबीत आहे.त्यासाठी जबाबदारीने इतर कार्यालयामध्ये ऑडीटमधील पॅराजमधील प्रत्येक महिण्याला आढावा घेतला जातो त्या प्रमाणे रेग्यूलर आढावा घेवून प्रत्येक महिण्याला विभाग प्रमुखाची बैठक घेतली जाईल जे अक्षेप बाकी आहे त्यांचा तातडीने आढावा घेवून ते अक्षेप कुणी केले त्यावर नवीन आक्षेप झाले कांपीटन्ट ऑथर्टीने ते आक्षेप मान्य केले का?हे पण बघीतले जाणार. ऑडीट होतांना जे पॅराज येतात त्यात प्रोसेसनुसार कार्यवाही व सक्षम अधिकाऱ्यांची मान्यता न घेणे विहित पध्दतीचा अवलंब न करता खरेदी केलेले गैरव्यवहाराचे ज्या ठिकाणी पैशाचा अपहार झालेला असतो असे वेगवेगळया प्रकारामध्ये याची विभागणी होईल यात ती दिसून आली नाही. जी वसुली येणे बाकी आहे त्याचा वेगळा आढावा घेतला जाईल. माझेकडे दिलेल्या माहितीनुसार जवळपास ७.८२ कोटी इतकी रक्कम या वेगवेगळया पॅराजमध्ये अडकली आहे.पॅराज वर्गीकरण जेंव्हा करतो त्यात नॉन रिव्हेन्यु पॅराज आणि रिव्हेन्यू पॅराज. झालेले काम ठिक आहे परंतु काही प्रोसेस केल्या नाही त्या बाबतीत पाठपुरावा करून कार्यवाही करता येते. जेथे महसूल येणे आहे त्यास रिव्हेन्यू पॅराज म्हणतो रिव्हेन्यूमध्ये रू. ८,८२,३९८३० रक्कम बाकी आहे. ही रक्कम कोणत्या संचिकेत कोणत्या पॅराज मध्ये किती त्यास कोण जबाबदार आहे हे सर्व बघणार आहोत ज्यांचे मूळे हे काम बाकी राहिले अडचणी निर्माण झ ाल्या ते बघून संबधीतावर योग्य ती कार्यवाही होईल.रू. ७७.५५ लक्ष रक्कम ॲडव्हॉन्स मध्ये घेतली समायोजन होणे बाकी आहे.यापैकी ७१.३१ लक्ष एवढी कर्मचारी/अधिकारी यांनी तर रू.६.२३ लक्ष एवढी रक्कम पदाधिकारी यांनी ॲडव्हॉन्स उचललेले आहे ही रक्कम ८ दिवसात समायोजन करण्या संदर्भात अधिकारी कर्मचारी दिं.१८-१०-२००८ रोजी प्रशासनाने नोटीस काढली परंतु पुढे कार्यवाही झालेली दिसत नाही. ऑडीट संदर्भात बैठक आयोजित केली असे लक्षात आल्यानंतर ज्यांनी उचल घेतली समायोजन केले नाही त्या त्या अधिकारी कर्मचारी यांना नुकतीच दोन दिवसापूर्वी ८ दिवसाच्या आत समायोजन करण्याची सूचना दिलेल्या आहे.जे समायोजन करणार नाही त्या कर्मचाऱ्यांचा सप्टेंबर महिण्याचा पगार रोखून त्यातून वसुली केली जाईल ज्यांचेकडे मोठी रक्कम आहे ती पगारातूनच नव्हे तर त्याची मालमत्ता जप्त करणे आवश्यकता वाटल्यास त्यांचेवर फौजदारी स्वरूपाची कार्यवाही केली जाईल पदाधिकारी यांचेकडील रक्कम समायोजन करण्या संदर्भात त्यांनाही नोटीस वगैरे देवून वसुलीसाठी जी जी कार्यवाही करावी लागणार ती होईल. जो आढावा आपल्या समोर

सादर केला आहे आर्थिक शिस्त ही सर्व स्तरावर पाळलीच पाहिजे.जेंव्हा ऑडीट केले जाते त्यावेळी अधिकारी कर्मचारी त्याकडे फारसे लक्ष देत नाही असे दिसून आले ऑडीटचे काम जेंव्हा विभागाचा मुद्या समोर येतो त्यावेळी त्या विभागास हाफ मार्जीन मेमो दिला जातो याचा अर्थ असा की जी काही अडचण येते अनियमितता दिसून येते त्या संदर्भात ऑडीट विभाग ताबडतोब खुलासा देण्याची मागणी करीत असतात काही पॅराज मध्ये पुर्तता झाली परंतु त्यावेळी संचिका मिळाली नसेल पाहता आली नसेल ,कर्मचारी जागेवर नसतील अशी पण कारणे असू शकतात.या प्रत्येक ऑडीट मुद्याचा आढावा घेतला जाईल व नियमानुसार जी जी कार्यवाही करणे आवश्यक आहे ती होईल ज्यामध्ये गैरव्यवहार आहे त्या संदर्भात तातडीने कार्यवाही केली जाईल. समायोजनासाठी थोडासा कालावधी दिला जाईल यापुढे प्रत्येक महिण्याला ऑडीट संदर्भात अधिकाऱ्यांची बैठक घेतली जाईल लेखा परीक्षण विभागास सुचना दिल्या जातील की त्यांनी पुढील ऑडीट हे नियमीत करावे प्रत्येक वर्षीचे ऑडीट हे त्या त्या वर्षीच पुर्ण केले तर सभागृहापुढे ही त्याच वेळी सादर केले जाईल.

श्री.मनमोहनसिंग ओबरॉय:टॅक्स वसुली ८.८२ कोटी येणे आहे. वसुली होत आहे पॅनॉल्टी लावू नये असे वारंवार सांगत आलो.थकीत रक्कमेवर दंड व्याज आकारणी करू नये नियमाने लावू शकत नाही ते न लावल्यास जास्त वसुली होईल मार्चपर्यत जे भरणा करील त्यांचेकडून वसुल करावे.कर्मचारी अधिकारी यांचेकडील ७१ लक्ष वसूल करण्यासाठी कार्यवाही करावी पदाधिकारी नगरसेवकांकडे असलेली येणे रक्कमेची यादी दयावी. १ महिण्याच्या आत ती रक्कम भरणा करतील सर्व भरण्यास तयार आहे.

श्री.संजय जोशी :ऑडीट करण्याच्या सूचना महापौर सभागृह देत असतात मा.आयुक्तांना सूचना देता येत नाही आताच आयुक्तांनी बोललेले शब्द कामकाजातून वगळावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : आयुक्त हे पण एक सदस्य असतात जेवढी जबाबदारी एका सदस्यांची असते तेवढी आयुक्तांची असते.

श्री.जेम्स अंबिलढगे : २४५ अक्षेप वगळण्यात आले असे म्हटले ते का वगळण्यात आले त्या संबधी काय कार्यवाही केली याची माहिति आलेली नाही या अक्षेपा बाबत स्थायी समितीने ज्या सूचना दिलेल्या आहे त्याची माहिती समोर आलेली नाही. ती देण्यात यावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :या अहवालावर मा.आयुक्तांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले जे अक्षेप आहे त्यावर वर्षवाईज काय कार्यवाही केली किती अक्षेपचा निपटारा केला या संदर्भात काय चौकशी झाली कुणावर कार्यवाही केली या बाबतीत संपूर्ण अहवाल सादर करण्यासाठी मा.आयुक्तांना एक महिण्याची मुदत दयावी त्यानुसार सभागृहात चर्चा करून दुरूस्ती करावी ही सभा पुन्हा आयोजित करावी.

श्री.सलीम खान :जे दोषी आहे त्यांचेवर काय कार्यवाही केली त्याचाही त्या अहवालात खुलासा दयावा.

मा.महापौर :सन १९९९-२००० ते २००५-०६ पर्यतच्या लेखा परीक्षण अहवाल या महत्वाच्या विषयावर चर्चा केली या अहवालामध्ये ज्या अनियमितता त्रुटी आढळलेल्या आहे त्यावर ही प्रामुख्याने चर्चा होते.आताच मा.आयुक्त यांनी खुलासा केला की काही प्रकरणात कार्यवाही केली अनुपालन झाले स्थायी समितीच्या चर्चेनंतर सर्वसाधारण सभेत येईपर्यत जवळपास ५० टक्के प्रकरणे हे निकाली निघाले होते त्याचे अनुपालन अहवाल सादर झाला होता परंतु अजूनही अनेक प्रकरणे म्हणजे गेल्या १० वर्षापासून प्रलंबीत आहे ही गंभीर स्वरूपाची बाब आहे. आताच मा.आयुक्तांनी म्हटल्या प्रमाणे गैरव्यवहारामध्ये ज्यांनी चुक केली अशावर मा.आयुक्त फौजदारी कार्यवाही करतील. ज्यांनी ज्यांनी ॲडव्हान्स मध्ये रक्कम उचल केली त्यांचे ते समायोजन करतील जर झाले नाही तर वसुली होईपर्यत त्या त्या कर्मचारी अधिकारी यांचे या महिण्याचे पगार थांबविण्यात येतील अशा प्रकारच्या सुचना मा.आयुक्तांनी त्यांचे खुलाशामध्ये दिल्या आहे.या पध्दतीने प्रशासन काम करणार आहे हे नक्कीच चांगली गोष्ट आहे. यापूढील ऑडीट हे नियमीतपणे करणे आवश्यक आहे तशा सुचना मुख्यलेखा परीक्षक यांना देण्यात येते. जी यात अनियमीतता आहे याचे सर्व समायोजन करून त्यात वर्षवाईज काय अक्षेप होते त्यात काय दुरूस्त्या केल्या ज्या संचिका मिळत नव्हत्या त्याची परीस्थिती काय त्यावर काय कार्यवाही केली नगररचना विभाग असेल किंवा इतर विभाग यातील ज्या दुरूत्या अक्षेप बाबत काय कार्यवाही केली या बाबत १ महिण्यात आत मा.आयुक्तांनी अहवाल सभागृहासमोर ठेवावा. कराचा भरणा करतांना स.स.श्री.ओबेरॉय यांच्या सूचना, त्यावर व्याज दंड लावू नये. नागरीकांनी आपली जबाबदारी ओळखून कर भरण्यास महापालिकेला सहकार्य करावे. ०१ महिन्यात अहवाल सभागृहापूढे सादर करण्यांत यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सन १९९९-२००० ते सन २००५-२००६ पर्यतच्या लेखा परिक्षण अहवालासंबंधी यात जी अनियमीतता आहे याचे सर्व समायोजन करून त्यात वर्षवाईज काय आक्षेप होते, काय दुरूस्त्या केल्या,ज्या संचिका मिळत नव्हत्या त्याची परीस्थिती काय,त्यावर काय कार्यवाही केली, लेखा परिक्षण आक्षेपाबाबत अनियमिततेबाबत दुरूत्या करून १ महिण्याच्या आत अहवाल सभागृहासमोर ठेवणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

याबरोबरच राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद